## थोडक्यात...

### परभणी शहरातील उड्डाण पुलावर ट्रकच्या तांत्रिक अडचणीमुळे मोठा अनर्थ टळला




(श्याम रनमले/दै.धर्मयोध्दा)

**परभणी -** शहरातील उड्डाण पुलावर आज ३ च्या सुमारात एक मोठी दुर्घटना टळली ट्रकच्या तांत्रिक अडचणीमुळे चालकाचे नियंत्रण सुटले. ट्रक थेट पुलाच्या कडेला जाऊन अडकला. सुदैवाने ट्रक खाली कोसळला नाही, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. काही काळ वाहतूक खोळंबली होती. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### श्री. अशोक काळे यांनी लिहिलेल्या द कंप्लिट स्पोकन इंग्लिश कोर्स या पुस्तकाचे प्रकाशन




**माजलगाव -** येथे श्री. अशोक काळे यांनी लिहिलेल्या द कंप्लिट स्पोकन इंग्लिश कोर्स या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. तालुका संघ चालक, जगदीशजी साखरे. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी मा. श्री. डॉ. प्रकाश आनंदगावकर. प्रमुख वक्ते मा. श्री. डॉ. कमलकिशोर लड्डा, प्रमुख उपस्थिती मा. श्री. बी. एन. कुलकर्णी, संचालक सातत्य कोचिंग क्लासेस, समीक्षक मा. श्री. डॉ. युवराज मुळये, मा. श्री. उमेश मोगरेकर अध्यक्ष तालुका पत्रकार संघ, झुंझार नेता. विशेष उपस्थिती मा. श्री. कलेशजी जाब्रस, दत्ताजी काळे, बाबूजी जोशी कार्यवाह श्री. सिद्धेश्वर शिशु विहार विद्यालय, तुकाराम बापू येवले, प्रशांत पत्की, प्रवीणजी शेजूळ, सागर करवा, भाग्यश्री करवा संचालक आयुष् ग्लोबल इंग्लिश स्कूल, गणेश माने, श्रीहरी शिंदे, गोविंद शिंदे, तसेच इतर मान्यवारांनी उपस्थिती दर्शवून लेखकांस शुभेच्छा दिल्या. कार्क्रमाचे सूत्रसंचालन श्री. श्रीकृष्ण शिंदे यांनी केले व सौ. वर्षा काळे यांच्या आभार प्रदर्शन व पसायदानाने सोहळ्याचा समारोप झाला.

# माजी खासदार राहुल शेवाळे बॉक्सिंगच्या रिंगणात;महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

## वरिष्ठ उपाध्यक्षपदी पदी रणजीत सावरकर, सचिवपदी डॉ. राकेश तिवारी यांची वर्णी



(दिनेश मराठे/ दै.धर्मयोध्दा)

**मुंबई -** बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया (बीएफआय) च्या निरीक्षकांच्या उपस्थितीत मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत, माजी खासदार राहुल शेवाळे यांची महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दादरच्या स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात १ मार्च रोजी पार पडलेल्या निवडणुकीत राज्यभरातील २५ संघटनांच्या एकूण ५० प्रतिनिधींनी एकमताने शेवाळे यांच्यासह एकूण १३ पदाधिकाऱ्यांना बिनविरोध निवडून दिले होते. कायदेशीर बाबींची पूर्तता करून नियमानुसार, नुकतीच बीएफआयने या संघटनेला मान्यता दिली. या संघटनेच्या वरिष्ठ उपाध्यक्ष पदी रणजीत सावरकर, सचिव पदी डॉ. राकेश तिवारी, कोषाध्यक्ष पदी मिलन वैद्य तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनिल त्रिवेदी यांची निवड करण्यात आली आहे.तसेच अर्जुन पुरस्कार विजेते कॅप्टन गोपाळ देवांग आणि ओलंपियन मनोज पिंगळे यांचा देखील कार्यकारणीत समावेश आहे.

राज्यभरातील एकूण २५ जिल्हास्तरीय बॉक्सिंग संघटनांची शिखर संस्था म्हणून बीएफआयशी समन्वय साधण्याची आणि राज्यभरातील बॉक्सिंगपटूंना हक्काचे व्यासपीठ देण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या जुन्या कार्यकारिणीची मुदत २०२२ मध्ये संपुष्टात आली होती. त्यानंतर काही कारणास्तव २०२५ पर्यंत असोसिएशनची निवडणूक झालीच नाही. कायदेशीर बाबींची पूर्तता न केल्याचा ठपका ठेवत,नोव्हेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या निवडणुकीला बीएफआयने अवैध ठरवले होते. त्यानंतर राज्यभरातील २५ जिल्हास्तरीय संघटनांच्या सहकार्याने कंपनी ऍक्टच्या कलम ८ अंतर्गत महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनची नोंदणी करण्यात आली आणि निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यात आली. बीएफआयचे नरेंद्रकुमार निरवाणा यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या निवडणुकीत एकूण १३ पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून उर्वरित २ जागांसाठी (१ पुरुष खेळाडू आणि १ महिला खेळाडू) येत्या काळात निवडणूक घेतली जाणार आहे.

"राज्यभरातील संघटनांच्या प्रतिनिधींनी माझ्यासह संपूर्ण कार्यकारिणीवर दाखविलेल्या विश्वासबद्दल मी त्यांचे आभार मानतो. राज्यभरातील बॉक्सिंगपटूंना आवश्यक त्या सुविधा देऊन अव्वल खेळाडू घडविण्यासाठी बीएफआयच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू" – राहुल रमेश शेवाळे, अध्यक्ष, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन

"सुमारे १९२५ पासून भारतात खेळल्या जाणाऱ्या बॉक्सिंग या क्रीडा प्रकारात महाराष्ट्रामध्ये आजवर अनेक अव्वल बॉक्सिंगपटू घडले. पद्मश्री पुरस्कारासह मेजर ध्यानचंद, अर्जुन, दादाजी कोंडदेव असे अनेक मानाचे पुरस्कार महाराष्ट्रातील बॉक्सिंगपटूंनी पटकावले आहेत. भविष्यात, या क्रीडा प्रकारात भारताची कामगिरी उंचावण्यासाठी आमच्या कार्यकारणीतील अनुभवी पदाधिकारी आणि खेळाडूंच्या साथीने आम्ही प्रयत्न करू" – रणजीत सावरकर, वरिष्ठ उपाध्यक्ष, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन.

> महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन कार्यकारिणी
> अध्यक्ष श्री. राहुल शेवाळे, माजी खासदार ( मुंबई ) उपाध्यक्ष -१) श्री. रणजित सावरकर, वरिष्ठ उपाध्यक्ष( ठाणे ) २) कॅप्टन गोपाल देवांग ( अर्जुन अवार्डी, पुणे) ३) श्री. अरुण बुटे ( राष्ट्रीय बॉक्सर, माजी बॉक्सिंग क्रिडा मार्गदर्शक, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक, राष्ट्रीय तांत्रिक अधिकारी, नागपूर ) ४) कु. सविता बावनथडे ( अमरावती, माजी बॉक्सर ) सचिव-श्री. राकेश तिवारी ( राष्ट्रीय तांत्रिक अधिकारी , चंद्रपूर ) सहसचिव १) श्री. मनोज पिंगळे ( ऑलम्पिअन, अर्जुन अवार्डी पुणे ) २) श्री. योगेश मुंदडा ( क्रिडा संघटक, सातारा ) ३) श्री. धनंजय बनसोडे ( आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक परभणी ) ४) सौ. निलम पाटील ( राष्ट्रीय पंचाधिकारी, पालघर ) कोषाध्यक्ष- श्री मिलन वैद्य ( राष्ट्रीय तांत्रिक अधिकारी आणि माजी बॉक्सर , ठाणे ) सदस्य- १) कु. साक्षी गायधनी ( आंतरराष्ट्रीय बॉक्सर नासिक ) २) श्री.विशाल खंडारे ( क्रिडा संघटक बॉक्सिंग बुलढाणा ) तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनिल त्रिवेदी ( मुंबई ) यांची निवड करण्यात आली आहे.

## धारासूरात वीज कोसळली, सुदैवाने हानी टळली

**परभणी-** गंगाखेड तालुक्यातील धारासूर या गावी सोमवारी रात्री वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसात एका मंदिरावर वीज कोसळली. सुदैवाने त्यात कोणतीही हानी झाली नाही. सोमवारी रात्री येथील श्रीराम मंदिरात काही पुरुष व महिला पोथी, पारायणाच्या निमित्ताने उपस्थित होत्या. परंतु, वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट होऊ लागल्याने पारायणासाठी जमलेले ग्रामस्थ घरी परतले. त्याचवेळी या मध्यवर्ती असणाऱ्या या ठिकाणच्या मंदिरावर वीज कोसळली. त्यात मंदिराच्या वरच्या भागाचे काहीसे नुकसान झाले. या प्रकाराने मात्र धारासूरवासीय चांगलेच भयभीत झाले.

## प्राथमिक शाळा गव्हा येथे आनंद नगरी उत्साहात

(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)

**बोरी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गव्हा येथे बाल आनंद नगरीचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्धाटन सौ. योगिता ताई रणजीत मोरे (जिल्हा. परिषद सदस्या कुपटा सर्कल) यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सौ. सोनिया केशव कोरडे,( अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) सौ.वैशाली नागरे, (उपाध्यक्षा शाळा व्य.समिती) सौ. शैला कलशेट्टी



(मुख्याध्यापक) अर्चना खडसे, गंगाबाई ईघारे हया उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थांचे दुकाने आकर्षक पद्धतीने तयार केली होती. आपल्या दुकानाची छान जाहिरात मुलांनी केली होती. त्यात समोसा, भेळ, चिवडा, पॅटीस, इडली वडा, डोसा, वडापाव, मसाला पापड, पाणीपुरी, लस्सी,टरबूज, चना मसाला या सारखे अप्रतिम पदार्थ विक्री साठी उपलब्ध होते, सौ.योगितताई यांनी मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक स्टॉल वर जाऊन खरेदी केली . अतीशय आनंद उत्साहात आनंद नगरीत सर्व पालक विद्यार्थी व गावकरी मंडळी मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थीत होती. मुलांना व्यवहार ज्ञान तसेच गणिती क्रिया, व्यवसाय कौशल्य विकसित करण्यासाठी असे उपक्रम शालेय स्तरावर आयोजीत करण्यात येतात. या कार्यक्रमासाठी श्री केशव कोरडे, दिनकर मोरे, नवनाथ मोरे,अर्जुनराव मोरे, प्रताप ईघारे, भानुदास कोरडे यांच्यासह अनेक पालक व गावकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शैला कलशेट्टी मॅडम,श्री. दिपक हरकळ सर, गजानन नंदाने सर अर्चना खडसे ताई यांनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र बास्केटबॉल लीग गाजवली छत्रपती संभाजीनगर गर्जना संघाची पहिल्याच वर्षी उपविजेतेपदाची ऐतिहासिक कामगिरी!



(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** पुणे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र बास्केटबॉल लीग स्पर्धेत यंदा क्रीडारसिकांना थरारक आणि उत्कंठावर्धक सामने पाहायला मिळाले. १४ मार्च ते २२ मार्च २०२६ दरम्यान शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित या स्पर्धेत राज्यभरातील एकूण १० पुरुष संघांनी सहभाग नोंदवला होता. या संपूर्ण स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गर्जना संघाने आपल्या दमदार आणि सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत मजल मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अंतिम सामन्यातही त्यांनी जोरदार लढत दिली; मात्र अत्यंत चुरशीच्या या सामन्यात त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तरीही त्यांच्या खेळातील जिद्द, संघभावना आणि चिकाटीमुळे त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विशेष बाब म्हणजे, गर्जना संघाचा हा पहिलाच सहभाग होता. पहिल्याच वर्षी अंतिम फेरी गाठणे आणि उपविजेतेपद मिळवणे ही संघासाठी मोठी आणि अभिमानास्पद कामगिरी ठरली आहे. नवख्या संघाने दाखवलेली ही चमकदार कामगिरी भविष्यातील यशाची नांदी मानली जात आहे. संघाचे मालक श्री. सार्थक मेघश्याम (सतीश) चौधरी यांनी संघाच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले, "पहिल्याच वर्षी आमच्या संघाने केलेली कामगिरी खरोखरच उल्लेखनीय आहे. उपविजेतेपद हा आमच्यासाठी मोठा सन्मान आहे. पुढील हंगामात आम्ही विजेतेपदासाठी अधिक जोमाने प्रयत्न करू." या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये लीगचे सीईओ श्री. अनिरुद्ध पोळ यांचे विशेष योगदान राहिले. त्यांच्या कुशल नियोजनामुळे आणि व्यवस्थापनामुळे संपूर्ण स्पर्धा सुरळीत आणि यशस्वीरीत्या पार पडली. महाराष्ट्र बास्केटबॉल लीगच्या माध्यमातून राज्यातील बास्केटबॉल खेळाला नवी उभारी मिळत असून, खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. छत्रपती संभाजीनगर गर्जना संघाची ही दमदार कामगिरी राज्यातील नवोदित संघांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## कुठलीही जात-पात न पाहता हिंदू एकजूट होणे गरजेचे: भरत आमदापूरे



(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)

**बोरी -** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील बाजार मैदानावर सकल हिंदू समाजाच्या वतीने विराट हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात बोलताना लेखक व अभ्यासक भरत आमदापूरे यांनी जात-पात न पाहता सर्व हिंदूंनी एकजुटीने एकत्र येणे येण्याचे आवाहन केले. ते पुढे म्हणाले की, हिंदूंना आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. हिंदू धर्म, भारतीय संस्कृती, विदेशी आक्रमणे, भारतीय घटना, तसेच हिंदू समाजाची एकजूट यांसारख्या विविध विषयांवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात आचार्य परसराज बाबा, मीनाक्षी कदम, राहुल राजुरकर, दीपक वर्णकर, महादेव सोनटक्के, गुलाब देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात विविध वक्त्यांनी हिंदूवरील अत्याचार, गुलामगिरी, संघर्ष आणि हिंदू एकतेची गरज या विषयांवर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान आदिती नावळ यांनी हिंदू गीत सादर केले. प्रास्ताविक डॉ. किरण वाकाणे यांनी केले तर अनिकेत अवचार यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन विशाल देशमुख यांनी केले आणि आभार आनंदकुमार मुख्या यांनी मानले. या संमेलनाला बोरी व परिसरातील हिंदू महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कंडारी गावात अवकाळी पावसामुळे आंब्याचे मोठे नुकसान

(गजेंद्र साखरे/ दै.धर्मयोध्दा)

**कंडारी-** कंडारी (ता. परतुर) वैजनाथ शिवाजी काटे गट नंबर १६५ मधील शेतात २०० झाडाचे नुकसान या शेतकऱ्यावर संकट उन्हाळ्यात अचानक आलेल्या अवकाळी पावसाने कंडारी गावातील शेतकऱ्यांचे जीवन विस्कटून टाकले आहे. २०० आंब्याच्या झाडांवरून फळे गळाली असून, जमिनीत पडलेली फळे खराब झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहे. यातील काही फळे पुढच्या लेकरासारखी वाढलेली होती. त्यांना गळाल्याचे दृश्य पाहून शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी वर्षभर मेहनत घालून झाडांची काळजी घेतली, त्यांना भरपूर पाणी, खत आणि संगोपन




दिले, पण अचानक आलेल्या पावसामुळे ही मेहनत व्यर्थ गेली. हे फळे त्यांचा जीविकोपार्जनाचा मुख्य आधार होते, आता ते पूर्णपणे नष्ट झाले आहे. नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, या नैसर्गिक आपत्तीमुळे त्यांचे आर्थिक नुकसान भयंकर आहे आणि शासनाकडून मदत मिळाली नाही तर पुढच्या उन्हाळ्यातील पिकांसाठीही गंभीर परिणाम होतील. शेतकऱ्यांनी आपले नुकसान टिपून अहवाल तयार केला असून, लवकरात लवकर शासनाला पाठवण्याची तयारी केली आहे. त्यांनी सांगितले की, पुढच्या पिढीसाठी झाडे वाढवताना केलेली मेहनत आता व्यर्थ गेली असून, शासनाकडून तातडीने मदत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, अशा अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे फक्त आर्थिक तोटा नाही तर मानसिक ताणही निर्माण झाला आहे. पुढच्या पिढीसाठी त्यांनी केलेले काम नष्ट होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे ते शासनाकडे नुकसानभरपाई मिळवण्यासाठी अर्ज करत आहेत आणि तातडीने कारवाई होण्याची अपेक्षा ठेवतात. कुल मिलाकर, कंडारी (ता. परतुर) गावातील शेतकऱ्यांना आलेल्या या अवकाळी पावसामुळे आर्थिक आणि भावनिक दोन्ही नुकसान झाले आहे. पुढच्या लेकरासारखे फळ गळाल्याचे दृश्य पाहून शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांनी शासनाकडे तातडीने नुकसानभरपाई मिळवण्याची मागणी केली आहे.

## 'शिक्षण क्षेत्रातील कर्तृत्वाला सलाम!' डॉ. बालाजी सुरवसे यांना 'चीफ एज्युकेशन आयकॉन पुरस्कार' बहाल




(मनोज पाटील/दै.धर्मयोध्दा)

**फोंडाघाट-** शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि दीर्घकालीन योगदानाची दखल घेत फोंडाघाट येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. बालाजी सुरवसे यांना 'चीफ एज्युकेशन आयकॉन पुरस्कार-२०२६' ने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथे आयोजित भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. छत्रपती हायर एज्युकेशन इंटेलेक्च्युअल फोरमच्या वतीने दादर येथील शिवाजी नाट्य मंदिरात हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या वेळी मान्यवरांच्या उपस्थितीत ब्रिगेडियर सुधीर सावंत (माजी खासदार) यांच्या हस्ते डॉ. सुरवसे यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ डॉ. सुरवसे यांनी शिक्षण क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांच्या अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली असून त्यांनी अनेक गुणवंत विद्यार्थी घडवले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच, अर्थशास्त्र अभ्यास मंडळावर दोन वेळा सदस्य म्हणून निवड होणे, कोकण विभागातील शैक्षणिक धोरणांमध्ये सहभाग आणि विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रम सुधारणा यामध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक संशोधन प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या सोहळ्यास आ. निरंजन डावखरे, आ. विक्रम काळे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद करांडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी डॉ. सुरवसे यांचे अभिनंदन केले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao